


कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात व्यापक कार्य करण्याच्या उद्देशाने गोवा शासनाने स्थापन केलेली कला अकादमी गेली चार दशके सर्वव्यापी उपक्रम राबवित आहे. संगीत, नाटक, नृत्य, शिल्प, चित्र, साहित्य, लोककला आणि अन्य पारंपारीक कलांच्या जतन आणि संवर्धनाबरोबरच गोमंतकाच्या तळागाळातील सर्वसामान्य कलाकार अकादमीशी जोडला जावा या उद्देशाने ही अकादमी विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करीत आहे. भजन, किर्तनासारख्या पारंपरिक कलांना लोकाश्रय आणि त्याचबरोबर राजाश्रय मिळवून देण्यासाठी कला अकादमीने महत्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे.

भजनसम्राट पं. मनोहरबुवा शिरगांवकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येत असलेली भजन स्पर्धा म्हणजे गोमंतकांच्या सांस्कृतिक क्षेत्रातला एक महाजागर. गोमंतकातील हजारो भजनी कलाकार 'जय जय राम कृष्ण हरी' चा गजर करीत अपूर्व उत्साहात ज्यात सहभागी होतात अशी ही स्पर्धा. १९७९-८० सालापासून या भजन स्पर्धेला प्रारंभ झाला. सुरवातीला पुरुष कलाकारापुरतीच ही स्पर्धा मर्यादीत होती. आता पुरुष, महिला व बाल अशा तीन गटात स्पर्धेचे आयोजन केले जाते, यातच या स्पर्धेचा लौकिक व लोकप्रियता सामावलेली आहे......!

**– कला अकादमी गोवा**

Produced by : Kala Academy Goa, Panaji-Goa - 403 001 (INDIA) Ph.: (0832) 2420451,52,53,54
Fax: 0832-2420457, Email: kalaacademygoa@yahoo.co.in





भजनसम्राट पं. मनोहरबुवा शिरगांवकर



मुशेल कला मंडळ, वास्को

३८व्या राज्यस्तरीय पुरुष कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक



भाविकादेवी महिला भजनी मंडळ, दिवाडी

राज्यस्तरीय महिला कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक




श्री सातेरी प्रासादिक संगीत संस्था–बेतोडा

राज्यस्तरीय बाल कलाकार भजन स्पर्धेतील विजेते पथक